N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वर्धा **P.S.(ठाणे):** समुद्रपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0109 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/02/2026 21:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 16/02/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2026
   **Time From (वेळेपासून):** 12:39 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/02/2026 **Time (वेळ):** 19:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2026 21:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय समुद्रपुर,समुद्रपुर, 442001

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): शा.तर्फे संदिप मुपडे ला.प्र.वि.वर्धा

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा,वर्धा ,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा,वर्धा ,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9975337552

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत केशवराव नंदेश्वर | | | 1. पाणेकर ले-आउट,श्रीकांत पाणेकर यांचे घरी,बस स्टप समोर, समुद्रपुर,समुद्रपुर, समुद्रपूर,वर्धा,महाराष्ट्र,भारत-442001 |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रार देताच

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



CS CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | Asus X00TD कंपनीचा मोबाईल फोन जुना वापरता | 4,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | आलोसे यांचे कडुन जप्त करण्यात आलेले कागदपत्रे | 0.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचे कडुन जप्त करण्यात आलेले कागदपत्रे | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 दराच्या 4 नोटा | 2,000.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | शर्ट | 0.00 |
| 6 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | 2 Sandisk कंपनीचे 32 GB चे मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ला.प्र.वि. जि. वर्धा.
कॅम्प पो.स्टे.समुद्रपुर,जि.वर्धा
दिनांक: 16/02/2026

मी संदीप मुपडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा दिनांक 16/02/2026 रोजी सकाळी 10.05 वाजता कार्यालयात हजर असताना, एक व्यक्ती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यलिय, वर्धा येथे आले व पोलीस उपअधीक्षक साहेब यांच्या कक्षात गेले. त्यानंतर काही वेळाने पोलीस उपअधीक्षक श्री राकेष साखरकर साहेबांनी मला आवाज देवुन त्यांचे कक्षात बोलाविले व त्यांनी त्यांचे कक्षात बसुन असलेल्या एका व्यक्तींचा परिचय करून दिला त्यावेळी त्या व्यक्तीने त्यांचे नाव श्री. सुरेष दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्ष, व्यवसाय षेती, रा. संत ज्ञानेष्वर वार्ड, हिंगणघाट ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा असे सांगुन त्यांची एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही दिनांक 16/02/2026 रोजी सकाळी 10.10 वा. ला.प्र.वि. कार्यालयातील वर्मचाUयांच्या हस्ते षासकीय पंचाना बोलाविले व तक्रारदार यांची दोन्ही षासकीय पंचाना ओळख करून दिली व तक्रारदार यांना एक कोरा कागद व पेन उपलब्ध करून देवुन तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार लिहुन आमचे समक्ष सादर केली असुन सदरची लेखी तक्रार खालीलप्रमाणे आहे.

लेखी तक्रार
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा
दिनांक: 16/02/2026
प्रति,
मा. पोलीस उपअधीक्षक साहेब,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा

अर्जदार:- श्री सुरेश दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्षे, व्यवसाय शेती, रा. संत ज्ञानेष्वर वार्ड, हिंगणघाट ता. हिंगणघाट



CamScanner

जिल्हा वर्धा मो.न. 8329269015

विशय :- एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी माझी लेखी तक्रार देतो की, वरील पत्यावर राहात असुन शेती व्यवसाय करतो. मी दिनांक 18/12/2025 रोजी तहसिलदार समुद्रपुर यांचे कडे माझे जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला होता. माझा जन्म दिनांक 01/07/1984 रोजी माझे घरीच झाल्याने त्यावेळी माझे आई-वडीलांनी माझे जन्माची नोंद केलेली नसल्याने मला नगरपंचायत समुद्रपुर येथुन जन्म प्रमाणपत्र मिळाले नव्हते. त्यामुळे मी तहसिलदार समुद्रपुर यांचे कार्यालयात अर्ज केलेला होता.

दिनांक 12/02/2026 रोजी मी तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे जावुन श्री. प्रशांत नंदेश्वर यांना भेटलो. त्यांनी माझा मोबाईल क्रमांक घेतला होता. त्यानंतर मी माझे कामाचे संबंधाने विचारपुस करुन माझे घरी आलो होतो. त्यानंतर मला सायंकाळी वेळ 05.49 वाजता माझे मोबाईल क्रमांक 8329269015 वर श्री.नंदेश्वर यांचे मोबाईल क्रमांक 9359586436 वरुन कॉल आला व त्यांनी माझे जन्म प्रमाणपत्र देणे बाबतचा आदेश देण्याकरीता 5000/- रुपये लागतील असे म्हणुन मला लाच मागणी केली होती. माझे मोबाईल मध्ये आलेले कॉल रेकॉर्ड होत नसल्याने मी कॉल रेकॉर्डीग करु शकलो नाही.

मला श्री. प्रशांत नंदेश्वर यांनी माझे कामासाठी 5000/- रुपयांची लाच मागणी केली असुन मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज दिनांक 16/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा येथील कार्यालयामध्ये येवुन माझे स्वहस्ताक्षरात माझी लेखी तक्रार देत आहे.

माझे व श्री. प्रशांत नंदेश्वर यांचे या आधीचे कुठलेही आर्थीक व्यवहार नसुन माझे तक्रारीवर योग्य कार्यवाही व्हीवी ही विनंती सही इंग्रजीत अस्पश्ट. श्री. सुरेष निकोरे दिनांक 16/02/2026 अशी तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार दिली. सदरची तक्रार आम्ही वाचुन दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी सदरची तक्रार वाचुन तक्रारदार यांचे तक्रारीवर व तक्रारदार यांनी सादर केलेले कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. तसेच आम्ही सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे कडुन सापळा कार्यवाही मध्ये वापरण्यात येणारी लाच रक्कम 5000/- रुपये आमचे हजर केल्यानंतर 500/- रूपये दराच्या 10 नोटांना सापळा पार्टीतील सदस्य पो.अंमलदार मंगेश गंधे यांच्या हस्ते पो.नि. संदीप मुपडे यांचे सही व लेबल असलेल्या सिलबंद अँन्थ्रासिनचे बाटलीचे सिल काढुन पो.अंमलदार मंगेश गंधे यांच्या हस्ते दोन्ही पंचाचे समक्ष तक्रारदार यांना अँन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माविषयी माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले व वरील 500/- रूपये दराच्या 10 नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन सदर नोटा एका को-या लिफापयामध्ये ठेवुन सदरचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. त्यानंतर पो.अंमलदार मंगेश गंधे यांना कार्यालयामध्येच हजर राहणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही आज दि. 16/02/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्री प्रशांत नंदेश्वर यांची लाचमागणीबाबत पडताळणी करणे असल्याने आम्ही दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे शासकीय वाहन क्र. एमएच-32-जे-0236 ने 11.35 वा. कार्यालयातुन रवाना झालो व तक्रारदार हे त्यांचे जवळील मोटार सायकल ने आमचे वाहणाचे समोर रवाना झाले व तक्रारदार समुद्रपुर जवळील दहेगांव रोड वरील ओंकार नगर येथे थांबले असता आम्ही सुध्दा वेळ 12.15 वा. तक्रारदार थांबुन असलेल्या ठिकाणी पोहचलो.

यानंतर आम्ही, तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्री नंदेश्वर, तहसिल कार्यालय समुद्रपुर यांचे लाच मागणी बाबत पडताळणी करणे असल्याने तक्रारदार व दोन्ही पंच यांना व्हॉईस रेकार्डर यांचे गुनधर्माबाबत माहिती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गैरअर्जदार श्री नंदेश्वर यांची कोठे भेट होईल? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी गैरअर्जदार नंदेश्वर हे त्यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे भेटतील असे सांगीतले. त्यावरुन आम्ही तक्रारदार, व पंच क्र. 01 यांना तक्रारदार यांच्या जवळील एम.एच. 32 ए.डब्लु. 3217 बजाज चेतक ने गै.अ. यांचे भेटीस रवाना करण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांना गै.अ. यांनी खरच लाच मागणी केली किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन आम्ही ट्रॅप बॅगमधील 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेमरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक MMC16A215F-TO BT XAH 2509 असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्डीग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून वेळ 12.39. वा. व्हॉईस रेकार्डर पंच क्र. 01 यांच्या आवाजात सुरू करून तक्रारदार यांना योग्य सुचना देवुन एम.एच. 32 ए.डब्लु. 3217 बजाज चेतक ने रवाना केले. त्यांनतर तक्रारदार हे



CamScanner

थोडयावेळाने मोटर सायकलने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकार्डर पंच क्र. 01 यांच्या आवाजात वेळ 13.04 वा. बंद केली असता, व्हॉईस रेकार्डरचे स्क्रिनवर फाईल क्र. 260216_1239 असा तयार झाल्याचे दिसले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना विचारणा केली असता, पंच क्र. 01 यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे गेलो असता, गैरअर्जदार हे त्यांचे कार्यालयात हजर होते. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे कामासंबंधी गै.अ. यांच्याषी बोलणी केली असता, गै.अ. यांनी तक्रारदार यांनी तहसिलदार समुद्रपुर जिल्हा वर्धा यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र देणे बाबत नगरपंचायत समुद्रपुर यांना आदेषीत करणे करीता केलेल्या अर्जावर आदेष काढुन देण्याकरीता 2000/- रुपये व काम झाल्यावर 3000/- रुपये अशी एकुण 5000/- रुपयांची मागणी केली व 2000/- रुपये लाच रक्कम आता देण्याबाबत सांगीतले त्यानंतर तक्रारदार यांनी थोडया वेळानी पैसे आणुन देतो असे म्हणुन तहसिल कार्यालय समुद्रपुर येथुन निघुन सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवुन संपुर्ण हकीकत पंच क्र. 01 यांनी आम्हास पंच क्र. 02 यांच्या समक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही सदरची व्हॉईस रेकॉर्डीग दोन्ही पंचाचे समक्ष ऐकली असता, गै.अ. श्री प्रशांत नंदेश्वर, तहसिल कार्यालय समुद्रपुर यांनी तक्रारदार यांना त्यांनी तहसिलदार समुद्रपुर जिल्हा वर्धा यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र देणे बाबत नगरपंचायत समुद्रपुर यांना आदेषीत करणे करीता केलेल्या अर्जावर नगरपंचायत समुद्रपुर यांना आदेष काढुन देण्याकरीता 2000/- रुपये व काम झाल्यावर 3000/- रुपये अशी एकुण 5000/- रुपयांची लाच रक्कमेची मागणी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन, तक्रारदार यांचे प्रलंबित काम आलोसे यांचे अधिकारक्षेत्रात नसतांना सुध्दा ते असल्याचे तक्रारदार यांना भासवुन तक्रारदार यांचे कडुन 2000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी असल्याचे संभाशणावरुन दिसुन आले. व्हॉईस रेकार्डर मधील संभाशणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करून पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आली आहे.

त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी 5,000/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी केली असुन सध्या गै.अ. यांना 2000/- रुपये लाच रक्कम म्हणुन देणे असल्याने तक्रारदार यांनी तक्रारीवेळी आमचे समक्ष हजर केलेले 5,000/- रूपये पैकी त्यांना 2000 रुपये 500/- रुपये दराच्या 04 चलणी नोटा पंचनामा दरम्यान पंच क्र. 01 यांना वाचलेल्या व पंच क्र. 02 यांनी एका कागदावर सदर नोटांचे क्रमांक नमुद केलेल्या नोटांपैकी अ.क्र. 1 ते 4 नोटा सापळा कार्यवाही मध्ये वापरण्याचा आम्ही दोन्ही पंचांचे समक्ष निर्णय घेतला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी प्रमाणे अँन्थ्रासिन पावडर लावुन असलेली लाच रक्कम 2,000/- रूपये ज्यात 500/- रूपये दराच्या 04 चलनी नोटा पो.षि. लक्ष्मण केंद्रे यांना लिफाफ्यामधुन बाहेर काढुन तक्रारदार यांचे शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन देण्याच्या सुचना दिल्याने पो.शि. लक्ष्मण केंद्रे यांनी तक्रारदार यांच्या षर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात अलगद ठेवुन दिल्या व पोषि लक्ष्मण केंद्रे यांना सापळा पार्टीतुन वघळुन दहेगांव रोड वरील ओंकार नगर येथेच थांबुन राहण्याबाबत सुचना दिल्या. आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तहसिल कार्यालय समुद्रपुर चे बाहेर येवुन त्यांचे डोक्यावरील टोपी त्यांचे डाव्या हाताने काढुन नियोजित इषारा करणे बाबत सुचना दिल्या त्यानंतर आम्ही टॅप्प बॅगमधुन 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेनरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक MMC16A215F-TO BT XAH 2509 असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्डींग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून व्हॉईस रेकॉर्डर वेळ 13.42 वा. पंच क्र. 01 यांचे आवाजात सुरू करून पंच क्र. 01 यांचेसह तक्रारदार यांना तक्रारदार यांचे जवळील एम.एच. 32 ए.डब्लु. 3217 बजाज चेतक ने रवाना करण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांचे समुद्रपुर तहसिल कार्यालयाचे समोर उभे केले व तक्रारदार व पंच क्र. 01 असे गै.अ. यांचे कार्यालयात गेले. आम्ही सुध्दा कार्यालयाचे जवळजवळ कोणालाही संषय येणार नाही, अशा प्रकारे आजुबाजुला तक्रारदार यांच्या नियोजीत ईशा-याची वाट पाहत थांबुन राहलो. त्यानंतर तक्रारदार यांनी वेळ 13.54 वा. तक्रारदार यांनी त्यांचे डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढुन नियोजित ईशारा दिल्याने आम्ही, तसेच पंच क्र. 02 व सापळा पार्टीतील सदस्य असे गै.अ. यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथील दालनामध्ये जावुन गै. अ. यांना आमचे ओळखपत्र दाखवुन त्यांना आमचा परिचय देवुन सर्वासमक्ष पंच क्र. 01 यांना विचारणा केली की, लाच रक्कम कोणी घेतली? व कोठे ठेवली? तेव्हा पंच क्र. 01 यांनी गै.अ. यांच्याकडे बोट दाखवुन लाच रक्कम यांनी स्विकारुन त्यांनी त्यांचे शर्टचे डाव्याबाजुच्या खिशात ठेवले आहे. असे सांगीतल्याने आम्ही गैरअर्जदार नंदेश्वर यांना स्टापचे मदतीने ताब्यात घेवुन पंच क्र. 01 यांना दिलेल्या सुचनेवरून व्हॉईस रेकॉर्डर वेळ 13.56 वा. बंद करण्यात आले. त्यावेळी व्हॉईस रेकॉर्डरचे स्क्रिनवर फाईल क्र. 26021_1342 तयार झाल्याचे आम्हाला दिसले. त्यानंतर आम्ही गैरअर्जदार यास त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. प्रशांत केशवराव



CamScanner

नंदेश्वर, वय 45 वर्षे, पद - महसुल सहायक, तहसिल कार्यालय समुद्रपुर जिल्हा वर्धा वर्ग - 3, रा. श्रीकांत पाणेकर यांचे घरी, पाणेकर ले-आउट, बस स्टॉप समोर, समुद्रपुर तह. समुद्रपुर जिल्हा वर्धा असे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 02 यांना दिलेल्या सुचनेवरून पंच क्र. 02 यांनी गै.अ. यांची अंगझडती घेतली. गै.अ. यांच्या अंगझडतीमध्ये गै.अ. यांनी परिधान केलेल्या गडद गुलाबी रंगाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशाच्या आत 500/- रुपये दराच्या 04 चलनी नोटा अशी एकुण 2000/- रूपये लाच रक्कम मिळुन आल्याने सदरची लाच रक्कम सापळा कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेली तिच आहे का? याबाबत सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 02 यांनी सापळा कार्यवाही अगोदर एका को-या कागदावर लिहुन ठेवलेल्या नोटांचे क्रमांक व गै.अ. यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंचासमक्ष पडताळणी केली असता, सापळा कार्यवाहीत वापरण्यात आलेली लाच रक्कम ही तीच असल्याने पंच क्र. 02 यांच्या ताब्यात तात्पुरती ठेवुन देण्यात आली.

त्यानंतर आम्ही सापळा पार्टीतील सदस्यांचे मदतीने काळया रंगाचे कापडाचे आवरण धरून साधारण आंधार केला व अल्ट्राव्हॅायलेट लॅम्प सुरु करुन त्याचा प्रकाश आळीपाळीने आमचे, पंच क्र 1 व सापळा पार्टीतील पोहवा सचिन गाढवे, पोषि विष्णु काळुसे,पोषि प्रितम इंगळे यांचे हाताचे पंजावर एक-एक करुन दोन्ही बाजुने तसेच कपडयांवर पाडला असता कोणतीही चकाकी दिसुन आली नाही. हि बाब आम्ही गै.अ. श्री. नंदेश्वर यांचे निदर्शनास आणुन दिली.

यानंतर स्टॉफचे मदतीने काळया रंगाचे कापडाचे आवरण धरून आम्ही वरनमुद नोटांवर अल्ट्राव्हॅायलेट लॅम्पचा प्रकाश एक एक करुन सर्व नोटांचे दोन्ही बाजूंवर टाकला असता नोटांवर अँथ्रॅासिन पावडरची रेघ असलेल्या ठिकाणी निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. यानंतर सदर लाच रकमेच्या नोटा आम्ही पंच क्र. 2 यांचे ताब्यात ठेवल्या.

त्यानंतर आम्ही गै.अ. यांचे हातावर काळा कापडाचे आवरण सापळा पार्टीचे मदतीने पकडुन अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाश पाडला असता, गैरअर्जदार नंदेश्वर यांचे दोन्ही हाताचे बोटावर निळसर पांढ-या रंगाचे चकाकी दिसुन आल्याने पंच क्र. 01 व तक्रारदार यांनी खात्री केली. तसेच गैरअर्जदार यांनी लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडुन स्विकारून त्यांनी घटनेवेळी परिधान केलेल्या गडद गुलाबी रंगाच्या शर्ट चे समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवल्याने अल्ट्रा व्हॅायलेट लॅम्पचा प्रकाश खिशाच्या आतील भागावर सापळा पार्टीच्या मदतीने प्रकाश पाडला असता, खिशाच्या आत निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली.

तसेच गै.अ. यांची पंच क्र. 02 यांनी आम्ही पुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे सापळ्या नंतरची अंगझडती घेतली असता, गै.अ. यांचे पॅन्टचे समोरील खिशातील असुस कंपनीचा काळ्या रंगाचा जुना वापरता ज्याला काळ्या पांढ-या रंगाचे रबरी कव्हर लावुन असलेला ज्यात जिओ कंपनीचे सिमकार्ड मो.क्रमांक 9359586436 असा असुन किंमत अंदाजे 4000/- रुपये, गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांनी परीधान केलेले गडद गुलाबी रंगाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवल्याने अँन्थ्रासिन पावडरच्या संपर्कात आल्याने सदरचा शर्ट तपास कामी जप्त करण्यात आला व लाच रक्कम 2,000/- रुपये, तसेच तक्रारदार यांचे कामाच्या संबंधाने गै.अ. यांचे टेबलवरील कागदपत्रे, लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही करीता वापरण्यात आलेले एकुण 02 मेमरी कार्ड तसेच आलोसे यांनी तक्रारदार यांना दिलेले कागदपत्रे असे सदर गुन्हयात सविस्तर जप्तीपत्रक तयार करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले आहे.

तरी आरोपी लोकसेवक श्री. प्रशांत केशवराव नंदेश्वर, वय 45 वर्श, पद - महसुल सहायक, तहसिल कार्यालय समुद्रपुर जिल्हा वर्धा वर्ग - 3, रा. श्रीकांत पाणेकर यांचे घरी, पाणेकर ले-आउट, बस स्टॉप समोर, समुद्रपुर तह. समुद्रपुर जिल्हा वर्धा यांनी तक्रारदार श्री सुरेश दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्षे व्यवसाय शेती, रा. संत ज्ञानेश्वर वार्ड, हिंगणघाट ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा त्यांनी तहसिलदार समुद्रपुर जिल्हा वर्धा येथे त्यांचे जन्म प्रमाणपत्र देणे बाबत नगरपंचायत समुद्रपुर यांना आदेशीत करणे करीता केलेल्या अर्जावर नगरपंचायत समुद्रपुर यांना आदेश काढुन देण्याकरीता 2000/- रुपये व काम झाल्यावर 3000/- रुपये अशी एकुण 5000/- रुपयांची लाच रक्कमेची मागणी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन, तक्रारदार यांचे प्रलंबित काम आलोसे यांचे अधिकारक्षेत्रात नसतांना सुध्दा ते असल्याचे तक्रारदार यांना भासवुन तक्रारदार यांचे कडुन 2000/- रुपये लाच रक्कम गैरअर्जदार यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथील दालणामध्ये पंच क्र. 1 यांचे समक्ष स्विकारताना रंगेहाथ मिळुन आल्याने भ्रश्टाचार प्रतिबंधक अधिनियम-1988 चे कलम 7अ अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्यांचेविरूध्द षासन तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष



CS CamScanner

(संदीप मुपडे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RAVINDRA MAHADEVRAO REWATKAR(SI (Sub-Inspector)) / 146010004450RMRM8201R **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपासी अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAVINDRA MAHADE'
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** 146010004450RMRM82



CS CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



CamScanner